**सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय. ०९-०००१२८-२०२०**

**नियमित दिवाणी दावा क्र. २१/२०२०**

**निशाणी क्र. ९४ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज हा वादी तर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ नियम ४ सह आदेश ६ नियम १७ अन्वये प्रतिवादी क्र. २ चे वारस रेकॉर्ड घेवून तशी दुरुस्ती करणेसाठी दाखल केला आहे.

२. वादीने आपल्या अर्जात असे कथन केले आहे की, प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र.२ अनिता तुकाराम तांबे ही मयत झालेली आहे. वादी यांस सदर प्रतिवादी क्र.२ यांचे वारस दाव्यात सामील करणेत यावेत व तशी दाव्यात दुरुस्ती करणेस परवानगी मिळावी अशी विनंती वादीने केली आहे.

३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन योग्य तो आदेश करावा असे म्हटले आहे.

४. या ठिकाणी हे नमूद करणे आवश्यक आहे की, वादीने निशाणी क्र.९० येथे मयत प्रतिवादी क्र.२ चा मृत्यूचा दाखला हजर केला आहे. सदरच्या मृत्यू दाखल्याचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र.२ अनिता तुकाराम तांबे या दि.१०/०४/२०१५ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. प्रस्तुतचा अर्ज वादीने उशिराने दाखल केलेला आहे. प्रस्तुतचा दावा हा वाटपासाठी दाखल केलेला आहे. मात्र न्यायालयास परिणामकारक व परिपुर्ण निवाडा करताना व वादी, प्रतिवादी यांच्यामध्ये असलेले वादाचे संपुर्ण निराकरण एकाच दाव्यामध्ये होणेसाठी न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून प्रस्तुत अर्ज मंजूर करुन मयत प्रतिवादी क्र.२ चे वारस अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**- आदेश -**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीस प्रतिवादी क्र.२ चे वारस अभिलेखावर आणणेस झालेला विलंब जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सिंधुदुर्ग यांना रक्कम रुपये १००/- देण्याच्या अटीवर माफ करणेत येत आहे.

३. खर्चाची रक्कम भरुन वादीने १४ दिवसांच्या आत दावा दुरुस्ती करुन पुढील पुर्तता करावी. सदर आदेशाची पुर्तता न केल्यास आदेश रद्दबातल समजणेत येईल.

NANDA BAPUSO GHATAGE
Digitally signed by NANDA BAPUSO GHATAGE
Date: 2024.11.19 14:01:09 +0530

( श्रीमती एन.बी.घाटगे )
दिनांकः१८/११/२०२४ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड.